# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य,मध्यवर्ती इमारत,पुणे-४११ ००१.

Web:www.dirde.org E-mail:info@dirhe.org.in.

फोन नं.०२०/,२६१२६९३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/एकलव्य/नविन मंजूरी/२०११-१२/१४अई/ ०३९ दि. २१-६-२०११


UNIVERSITY OF PUNE (General Section) 04 JUL 2011 Inward No.: 893


**परिपत्रक :-**

प्रति,

१) कुलसचिव,
महाराष्ट्र राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठे.

२) विभागीय शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण),
पुणे/मुंबई/कोल्हापूर/औरंगाबाद/नागपूर/नांदेड/
जळगांव/अमरावती/पनवेल/सोलापूर.

**विषय : पदव्युत्तर स्तरावर शिक्षण घेणा-या पात्र विद्यार्थ्यांची एकलव्य आर्थिक सहाय्यासाठी आवेदनपत्रे सादर करणेबाबत. नविन मंजूरी सन २०११-२०१२.**

**संदर्भ** : १.शासन निर्णय क्र.एससीएच/१०९५/(८१)/मशि-४,दि.७ फेब्रुवारी,१९९६.

संदर्भांकित शासन निर्णयान्वये कला,वाणिज्य,विज्ञान व विधी या विद्याशाखांच्या अंतर्गत पदव्युत्तर शिक्षण घेणा-या आणि विहित अटी पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र शासनाने सन १९९५-९६ या वर्षापासून एकलव्य आर्थिक सहाय्य योजना सुरु केलेली आहे.

२/- आपल्या कार्यक्षेत्रांतर्गत सन २०११-२०१२ या शैक्षणिक वर्षात पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या पात्र विद्यार्थ्यांकडून दि.३०/०९/२०११ अखेरपर्यंत विहित नमुन्यात अचूक व परिपूर्ण भरलेली आवेदनपत्रे सहपत्रासह मागविण्यात येत आहेत.सदर प्रस्ताव स्विकारण्याचा अंतिम दि.३०.९.२०११ असून त्यानंतर प्राप्त झालेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

३/- एकलव्य आर्थिक सहाय्य योजनेबाबतची सविस्तर माहिती संदर्भिय शासन निर्णयामध्ये नमूद केलेली आहे.एकलव्य आर्थिक सहाय्यासाठी पात्रतेच्या प्रमुख अटी खालीलप्रमाणे आहेत.

१. पदवी परीक्षेत विज्ञान शाखेत किमान ७० टक्के गुण, तर कला,वाणिज्य,विधी शाखेत किमान ६० टक्के गुण मिळविलेले असावेत. ( शासनाकडून प्राप्त आर्थिक तरतूदीनुसार गुणानुक्रमे जास्त गुणांनुसार अर्जाचा विचार करण्यात येईल.)

२. संबंधित विद्यार्थ्यांचे व त्याच्या आई-वडिलांचे/पालकाचे सर्व मार्गानी मिळून मागील आर्थिक वर्षाचे ( एप्रिल २०१० ते मार्च २०११) वार्षिक उत्पन्न रु.७५,०००/- पेक्षा कमी असावे.

३. पदव्युत्तर द्वितीय वर्षासाठी आर्थिक सहाय्याचे नुतनीकरण मंजूर करण्यास पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षी किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. किमान वार्षिक ७५ टक्के नियमित उपस्थिती आवश्यक आहे तसेच चांगली वर्तणूक असणे आवश्यक आहे. याबाबत प्राचार्य/विद्यापीठीय विभाग प्रमुख यांचे सुस्पष्ट प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षी अनुत्तीर्ण असलेल्या व एटीकेटी मिळालेल्या विद्यार्थ्यांना नुतनीकरण मंजूर करता येत नाही. याची कृपया नोंद घ्यावी तसेच शासनाकडून प्राप्त होणा-या आर्थिक तरतूदीच्या आधीन

राहून गुणवत्तेनुसार गुणानुक्रमे संबंधित विद्यापीठनिहाय मंजूरी देण्यात येईल. त्यामुळे विहित गुणांची अट हे सांगून एकलव्य आर्थिक सहाय्य न मिळाल्यास कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही अशा सुचना बोर्डावर लावाव्यात.

४. हया योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना रु.५०००/- प्रतिवर्षी आर्थिक सहाय्य देण्यात येते.

५. एकलव्य आर्थिक सहाय्याबाबत विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेले नविन मंजूरीचे आवेदनपत्रे विद्यापीठे/महाविद्यालये यांनी त्यांचे स्तरावर जबाबदारीने तपासून न पाहता पाठविली जातात असे संचालनालयाच्या निदर्शनास आलेले आहे म्हणून पात्र विद्यार्थ्यांना एकलव्य आर्थिक सहाय्य मंजूर करणेकामी अडचणी निर्माण होतात व कार्यालयाचा वेळ खर्च होतो.. विद्यार्थ्यांस आर्थिक सहाय्य मिळण्यास विलंब होऊ नये किंवा विद्यार्थी आर्थिक सहाय्यापासून वंचित राहू नये म्हणून नविन मंजूरीचा प्रस्ताव सोबत दिलेल्या सूचनाप्रमाणे विद्यापीठ व महाविद्यालये यांनी प्रथम त्यांचे स्तरावर अर्ज तपासूनच अंतिम मंजूरीसाठी या संचालनालयाकडे दिलेल्या विहित मुदतीतच पाठविण्यात यावेत. लाभार्थी विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे अचूक व परिपूर्ण भरावीत म्हणून संदरचे परिपत्रकांची प्रत व सूचनांची प्रत फलकावर लावावी.तसेच सदरचे प्रस्ताव हे फक्त विद्यापीठे/महाविद्यालयामार्फतच स्विकारुन विचारात घेतले जातील.

**६. अपूर्ण असलेल्या व बिनचूकपणे न भरलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

७ सोबत आवेदनपत्रे/वार्षिक प्रगती अहवाल परिपत्रक व सूचनापत्रक जोडली आहेत त्याप्रमाणे आपण आपले कार्यक्षेत्रातील सर्व शासकीय व अशासकीय महाविद्यालयांना लवकरांत लवकर पाठविण्यात यावेत याबाबत केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची प्रत या संचालनालयास पाठविण्यात यावी.

**८. विद्यार्थ्यांनी त्यांच्या नजिकच्या बँक ऑफ महाराष्ट्र शाखेत/राष्ट्रीयकृत बँकेत बँक खाते उघडणे बंधनकारक असून,विद्यार्थ्यांनी त्याचा सद्याचा स्वतःहाचा अस्तित्वात असलेला खाते क्रमांक,बँकेचा संपूर्ण पत्ता,बँक शाखा,शाखा कोड नंबर आयएफएससी कोड तसेच बँकेचा एमआय सीआर कोड इत्यादी माहिती बिनचूकपूणे अर्जात नमूद करावी.**

**९. क्रमांक ८ बाबतचे बँकेचे आजपर्यंत भरलेले पासबुकाची पहिल्या व शेवटच्या पानाची झेरॉक्स प्रत अत्यंत आवश्यक आहे.**

**१०. प्राचार्यांनी अ.क्र.८ व क्र.९ बाबत पूर्णतः खात्री केल्याचे वेगळे प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे.**

**शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य,पुणे-१,**
**यांचेकरिता.**